MHBI100012202006

## नियमीत दिवाणी दावा क्रमांक १८४/२००६ मधील निशाणी क्र.१७२ वरील आदेश

[०१] प्रस्तुत अर्ज वादी यांनी दाव्यात प्रतिवादीच्या कक्षेत प्रतिवादी नं.१४ म्हणून फारोक सादेक कुरेशी यांना आवश्यक पक्षकार म्हणून समाविष्ट करण्याकामी दाखल केला आहे.

[०२] प्रतिवादी तर्फे प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध दर्शवला. प्रतिवादींनी असे कथन केले की, तथाकथित खरेदीखत हे सन २००७ साली केल्याचे वादीला माहित असुन देखील वादीने जाणुन बुजुन प्रकरण प्रलंबित ठेवण्याच्या उद्देशाने प्रस्तुत अर्ज दिलेला आहे. प्रस्तुत अर्ज हा असंदिध्द स्वरुपाचा असल्यामुळे तो नामंजुर होण्यास पात्र आहे.

[०३] दोन्ही बाजुच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

[०४] प्रस्तुत दावा वादीने वाटणी करुन ताबा मिळणेबाबत दाखल केला आहे. प्रस्तुत दाव्यात वादीने दाखल केलेल्या खरेदीखतावरुन हे स्पष्ट होते की, प्रतिवादी क्र.२ ने दावा प्रलंबित असतांना दि.०७.०९.२००७ रोजी प्रस्तावित प्रतिवादी क्र.१४ यांच्या नावे वादग्रस्त मिळकत क्र.२–३–७३ अ या मिळकतीचे नोंदणीकृत खरेदीखत लिहुन दिलेले आहे. अशा परिस्थीतीत प्रस्तावित प्रतिवादी क्र.२ हे प्रस्तुत दाव्यात आवश्यक पक्षकार असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे सदर प्रस्तावित प्रतिवादी क्र.२ यांना प्रतिवादीच्या कक्षेत समाविष्ट करुन घेणे कायदयाचे दृष्टीने व दाव्याचे अंतिम निराकरण होण्याचे दृष्टीने गरजेचे आहे. परंतु, प्रस्तुत अर्ज वादीने विलंबाने दाखल केल्याचे दिसुन येते. सदर विलंबाबाबत वादीवर योग्य तो खर्च लादुन अर्ज मंजुर करणे न्यायोचित ठरेल. सबब, खालील आदेश पारीत करण्यात येतो.

<u>**आदेश**</u>

(१) प्रस्तुत अर्ज प्रत्येकी रक्कम रुपये १,०००/- इतका खर्च प्रतिवादी क्र. १ व ९ यांना देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येत आहे.

(२) वादीने प्रतिवादी १४ म्हणून फारोक सादेक कुरेशी यांना दाव्यात समाविष्ट करुन तशी दुरुस्ती या आदेशापासून १४ दिवसाच्या आत करुन प्रस्तुतच्या दाव्याकामी दुरुस्त दाव्याच्या प्रती दाखल कराव्यात.

(३) वादीनी खर्चाची रक्कम पुढील तारखेपर्यंत अन्यथा न्यायालयाने वाढवुन दिलेल्या तारखेपर्यंत प्रतिवादी क्र. १ व ९ यांना दयावी.

(४) प्रस्तावीत प्रतिवादींना दाव्यात हजर करणेकामी योग्य ती दखल वादीने घ्यावी.

(५) अर्जाचा खर्च अर्जदाराने सोसावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PATIL PRAVIN VISHWAS
Date: 2025.04.17 17:03:19 +0530

(प्रविण वि.पाटील)
दिनांक:- १७.०४.२०२५. २रे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, केज.

CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file are word to word as per original judgment/ order.

| | |
|---|---|
| Dictated on | : 17/04/2025 |
| Transcribed on | : 17/04/2025 |
| Checked & signed on | : 17/04/2025 |

Sd/-

(P. P. Raut),
Stenographer Grade-3,
Ct. of CJJD and JMFC, Kaij.